महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १२३ /२०२२ दि. २२/१२/२०२२

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील व डोंबिवली वाहतूक उप विभागाच्या हद्दीतील **१)** नवकार सोसायटी, गजबंधन पाथर्ली रोड, डोंबिवली पुर्व हा रस्ता डोंबिवली शहरास जोडणारा एक मुख्य रस्ता असून सदर रोड वरील अनधिकृत पार्किंगमुळे तेथील नागरिकांना, व्यावसायिकांना तसेच इतर सर्व सामान्य नागरिकांना वाहतूक कोंडीस सामोरे जावे लागत आहे. **२)** संतवाडी, चोळेगाव, ठाकुर्ली, डोंबिवली पुर्व हा रस्ता ठाकुर्ली रेल्वे स्टेशनकडे जाणारा रस्ता असून सदर रस्त्याचा वापर डोंबिवली शहरातील व इतर ठिकाणी कामाला जाणारा कर्मचारी वर्ग करत असून सदर रोडवरील अनधिकृत पार्किंगमुळे तेथील रहिवासी नागरिकांना, रेल्वे स्थानकातून डोंबिवली शहरात इतरत्र जाणारे नागरिकांना वाहतूक कोंडीस सामोरे जावे लागत आहे. त्यातच पार्किंग करणारे वाहनधारक व तेथील रहिवासी यांच्यात गाडया पार्किंगच्या कारणावरून वाद निर्माण होत आहेत. **३)** लक्ष्मीबाई नेरूरकर रोड परिसरातील इमारती, चाळी, शाळा, व्यावसायिक दुकाने, दवाखाने, गार्डन, गॅरेज असून सदर ठिकाणी शाळा सुटण्याचे व भरण्याचे वेळेत, शाळांच्या मोठया बसेस व इतर खाजगी पार्क केलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते.

**ज्याअर्थी,** वरील नमूद परिसरात रस्त्याचे कडेला दुचाकी, चार चाकी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी करण्यात येत असल्याने इतर वाहनांना वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्किंग, पी–१ व पी–२ पार्किंग** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

| अ.क्र. | नो पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | गजबंधन पाथर्ली रोड, डोंबिवली पुर्व येथील नवकार सोसायटीचे उजवे बाजूस ५० मीटर व डावे बाजूस ५० मीटर | नो पार्किंग | १०० मीटर | २४ तास |
| २ | संतवाडी, चोळेगाव रस्ता, ठाकुर्ली, डोंबिवली पुर्व | नो पार्किंग | १०० मीटर | २४ तास |
| ३ | दत्तनगर चौक ते स्वामी विवेकानंद विद्यालय, लक्ष्मीबाई नेरूरकर रस्त्याचे उजवे बाजूस | पी–१ | १५० मीटर | २४ तास |
| ४ | दत्तनगर चौक ते स्वामी विवेकानंद विद्यालय, लक्ष्मीबाई नेरूरकर रस्त्याचे डावे बाजूस | पी–२ | १५० मीटर | २४ तास |

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

- मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
- मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
- मा. जिल्हाधिकारी, ठाणे
- मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
- मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
- नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner